☎ : 07172-264300
: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)


## चंद्रपूर पोलीसांची अवैध दारूविक्री करणाऱ्यांवर कार्यवाही

जिल्हयात दारूबंदी घोषीत झाल्यापासुन अवैध दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर चंद्रपूर जिल्हा पोलीस प्रभावी कार्यवाही करण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. यादरम्यान दिनांक २०/०१/२०१९ रोजी जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत नाकेबंदी आणि छापे टाकुन अवैध दारूचा साठा जप्त करण्यात पोलीसांना यश प्राप्त झाले आहे.

यामध्ये जिल्हयातील पोलीस स्टेशन **बल्लारशाह, चंद्रपुर शहर, घुग्घुस, दुर्गापुर, पडोली, वरोरा, शेंगाव, माजरी, मुल, सिंदेवाही, सावली, राजुरा, कोठारी, गोडपिंपरी** अंतर्गत संबधीत पोलीस पथकाने प्रभावी कार्यवाही करीत दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्याच्या विरूध्द जिल्हयात एकुण **२१** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन ०७ आरोपींना अटक करण्यात आले आहे. सदर गुन्हयात एकुण **१,०४,१५०/—रू.** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढिल तपास संबंधीत पोलीस स्टेशन करीत आहे.

---

### ६) पोलीस स्टेशन धाबा :—

दिनांक **२०/०१/२०१९** रोजी पोलीस स्टेशन **धाबा** अंतर्गत मौजा सुकवासी येथे ०४ आरोपी ईसम हे कोंबडयाच्या झुंजीवर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **धाबा** येथे अप. क्र. **१६/२०१९** कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयात घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यसह नगदी असा एकुण **४,२००/—रू.** चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **धाबा** पोलीस करीत आहे.

---

## प्रेस नोट

दिनांक २०/०१/२०१९ रोजी नेहमीप्रमाणे वणी नाका येथे नाकाबंदी सुरू असतांना तेथे तैनातीस असलेल्या पोलीस शिपाई दिनेश मेश्राम व सुरज मेश्राम हे वाहनांची तपासणी करीत होते. दरम्यान १०:३० वाजता दोन टाटा योध्दा चारचाकी मालवाहु वाहने वणीकडुन भरधाव वेगाने येत असतांना दिसुन आले. त्यांना तैनात असलेल्या पोलीस कर्मचारी यांनी दुरूनच वाहन थांबविण्याचा इशारा दिला परंतु ते भरधाव वेगाने सरळ निघुन गेले. संशय बळावलयामुळे दोन्ही पोलीस कर्मचारी यांनी त्यांचा पाठलाग केला. व घडलेला प्रकाराबदद्लची माहिती पोलीस स्टेशन वरोरा येथील प्रभारी अधिकारी यांना सांगीतली. प्रभारी अधिकारी यांनी तात्काळ सदरची माहिती खांबाळा येथे नेहमीप्रमाणे सुरू असलेल्या नाकाबंदीवरील पोलीस कर्मचारी यांना देवुन सर्तक आणि काळजीपुर्वक नाकाबंदी करण्याची सुचना दिली.

नागपुर मार्गावरील खांबाळा चेक पोस्ट येथे नाकाबंदी डयुटीकरीता पोलीस कॉन्स्टेबल प्रकाश मेश्राम व कमलेश मोहमारे हे तैनात होते. काही वेळातच मिळालेल्या माहितीनुसार वरोरा ते नागपुर मार्गे दोन टाटा योध्दा चारचाकी मालवाहु वाहने भरधाव वेगाने येत असतांना दिसुन आले. सदरच्या वाहनांना प्रकाश मेश्राम यांनी बॅरीकेट्सच्या मागे राहुन बॅटरी व लाठीच्या साहायाने दुरूनच वाहन थांबविण्याचा इशारा दिला. परंतु त्या दोन्ही वाहनचालकांनी त्यांना न जुमानता आपले वाहन भरधाव वेगाने बॅरीकेट्स उडवित नाकाबंदीमध्ये तैनात असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या अंगावर चढविले. यामध्ये पोलीस शिपाई प्रकाश मेश्राम यांना वाहनाची जोरदार धडक लागल्याने त्यांना जागीच विरमरण आले.

सदर घटनेतील दोन्ही वाहने व त्यातील २४ जनावरांना ताब्यात घेण्यात आले असुन आरोपी १) इम्तीयाज अहमद फैयाज वय १९, २) मोहम्मद रजा अब्दुल जब्बार कुरेशी वय १९, यांना घटणास्थळावरूनच अटक करण्यात आले तर दुसऱ्या वाहनातील पसार झालेल्या दोन आरोपींच्या शोधाकरीता पोलीस अधीक्षक श्री. महेश्वर रेडडी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा येथील दोन पोलीस पथक, उपविभागीय पोलीस अधिकारी वरोरा यांचे एक पथक रवाना करण्यात आले होते. सदर पथकाद्वारे पसार झालेले १) मोहम्मद फहीम शेख अजीम शेख वय २३, २) आदिल खान उर्फ मोहमंद कादीर खान वय २१ या दोन्ही आरोपींना आज दिनांक २१/०१/२०१९ रोजी नागपुर परिसरातील कामठी येथुन अटक करण्यात आली आहे. सदर आरोपींविरूध्द पोलीस स्टेशन वरोरा येथे अप.क्र. ७२/२०१९ कलम ३०२, ३०७, ३५३, ३३२, ३३३, ३४

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२१ जानेवारी,२०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
✍: 7276494810 (PRO)

भादंवि सहकलम ११ महाराष्ट्र प्राणी सरक्षण अधिनियम कायदा, कलम १८४, ८३/१७७ मोटार वाहन कायदा व कलम ४७, ४८, ४९(अ), ५०(अ), ५४ पशु वाहतुक अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असुन सदर गुन्हयाचा तपास प्रो. आयपीएस अधिकारी श्री. नवनित कांवत यांच्या कडे सोपविण्यात आला आहे.

आपले कर्तव्य बजावित असतांना विरमरण प्राप्त झालेले पोलीस शिपाई श्री. प्रकाश मेश्राम हे मुळचे बल्लारशाह येथील रहीवासी असुन सन २०१२ साली चंद्रपुर पोलीस विभागात पोलीस शिपाई म्हणुन रूजु झाले. त्यांच्या पाठीमागे त्यांच्या परिवारामध्ये वृध्द आई वडील, एक भाउ, पत्नी व एक १ वर्षाची मुलगी आहे. आज रोजी पोलीस मुख्यालय ड्रिल शेड येथे केंद्रीय गृहराज्यमंत्री मा. ना. श्री. हंसराज अहिर, एफडीसीएम अध्यक्ष मा. श्री. चंदनसिंग चंदेल व पोलीस महानिरिक्षक नागपुर परिक्षेत्र नागपुर श्री. मल्लीकार्जुन प्रसन्ना तसेच वरिष्ट पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत शोक सलामीसह भावपुर्ण श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. विरमरण प्राप्त झालेले पोलीस शिपाई श्री. प्रकाश मेश्राम यांच्या कुटुंबींयाना मुख्यमंत्री सहायता निधितुन १० लक्ष रोख रक्कम देण्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. सुधिर मुनगंटीवार यांनी जाहिर केले असुन पोलीस वेलफेअर फंड, गटविमा, डीसीपीएस फंड, पोलीस सॅलरी इन्शुरंस इत्यादी मधील सहायता निधी पोलीस शिपाई श्री. प्रकाश मेश्राम यांच्या कुटुंबीयांना मिळण्याकरीता पोलीस अधीक्षक यांच्या आदेशाने कार्यवाहीस त्वरीत सुरूवात करण्यात आली आहे.

---